# सुचना

जा.क्र. :मं.वि.यो./नामप्रविप्रा/सुचना—कलम ३७/ दिनांक : / /२०२५

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल—**

ज्याअर्थी, नागपूर महानगर प्रदेशाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस—२४१६/प्र.क्र.—१२२(अ)/२०१६/नवि—९, दि. ०५/०१/२०१८ अन्वये भागश: मंजूर झालेली असून, दि. ०९ फेब्रुवारी, २०१८ पासून अंमलात आलेली आहे. तसेच उर्वरीत भागाची विकास योजना (EP/Excluding Part) शासन निर्णय क्र. टिपीएस—२४१६/प्र.क्र.—१२२(ब)/ई.पी./२०१६/नवि—९, दि. २१/०२/२०१९ अन्वये मंजूर झालेली आहे; (यापुढे ''उक्त विकास योजना'' असे संबोधले आहे)

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत मौजा—खैरी, तह. कामठी, खसरा क्र. ६४/१, क्षेत्र १.०६ हे.आर. ही जागा East-B अर्बन सेक्टर मध्ये **''निवासी''** विभागात समाविष्ट आहे. (यापुढे ''उक्त जागा'' असे संबोधले आहे)

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन ''निवासी'' या विभागातून वगळून ''औद्योगिक'' विभागात अंतर्भुत करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल करण्याचे ठरविले आहे. सदर क्षेत्राकरीता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे नियोजन प्राधिकरण आहे व यासाठी **विषय क्र. २(iv)/०९/१२/०२/२०२५** अन्वये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा उक्त विकास योजनेचा भाग नकाशा नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, स्टेशन रोड, सदर, नागपूर—४४०००१ या कार्यालयात कामकाजाच्या सर्व दिवशी कार्यालयीन वेळेत जनतेच्या निरिक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे. सदर अधिसूचना प्राधिकरणाच्या www.nmrda.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. तरी नागरीकांना सुचित करण्यात येते की, ही सुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात ज्या सुचना किंवा हरकती नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त होतील, त्यावर नागपूर महानगर प्रदेश प्राधिकरणाकडून सुनावणी देण्यात येईल. तद्नंतर फेरबदलाचा उक्त प्रस्ताव शासनाकडे मंजूरीस्तव सादर करण्यात येईल.

**नागपूर :**
**दिनांक :**

**(संजय मीणा)**
**महानगर आयुक्त,**
**नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**नागपूर**

# NOTICE

**Letter No. D.P. (NMRDA)/ Notification-Sec 37 Date: / /2025.**

**Modification under Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

Whereas, the Development Plan of Nagpur Metropolitan Region Development Authority has been partially sanctioned by the Govt. vide Urban Development Department Notification No. TPS-2416-CR-122(a)-2016-UD-9, Dt. 05 January 2018 and came into force from 9 February 2018. Excluded part of Development Plan has been sanctioned vide Government Notification No. TPS-2416-CR-122(b)-EP-2016-UD-9, Dt. 21" February 2019. (Hereinafter referred to as said Development Plan)

And, whereas, in the said Development Plan, the land bearing Khasara No. **64/1** of Mouza- **Khairi**, Tah – **Kamptee**, Dist. - Nagpur admeasuring area 1.06 Hectare is included in **East-B** Urban Sector & **"Residential"** Zone (hereinafter referred to as said Land )

And whereas, as per Section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Nagpur Metropolitan Region Development Authority has decided to modify the land use for said land and to be included in **"Industrial"** Zone**.** The Planning Authority for the said land is Nagpur Metropolitan Region Development Authority. The Nagpur Metropolitan Region Development Authority has passed Resolution No. 2(iv)/09/12/02/2025, has to make the aforesaid modification.

Therefore, the part of said Development Plan showing the aforesaid modification are kept open at the office of the Nagpur Metropolitan Region Development Authority, Station Road, Sadar, Nagpur-440001 for inspection by public during office hours on all working days. This Notification shall also be available on the this office website www.nmrda.org The suggestions and objections which may be received to Nagpur Metropolitan Region Development Authority in respect of the said modification to the Development Plan within a period of one month from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette will be heard by the Nagpur Metropolitan Region Development Authority before submitting the said modification proposal, to the State Government for sanction.

Nagpur **:**

Date :

**(Sanjay Meena)**
**Metropolitan Commissioner,**
**Nagpur Metropolitan Region Development Authority,**
**Nagpur**